लोकमत शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२०



# आयपरमध्ये रक्तदान शिबिर

वर्धा : स्थानिक औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) व जवाहरलाल नेहरू मेडीकल कॉलेज व रुग्णालय सावंगी (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरला प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र गंजीवाले, डॉ.भुषणकुमार साठे, सावंगी वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.किशोर हिवाळे उपस्थित होते. यावेळी डॉ.भुषण गंधारे, प्रा.गिरीष दहीकर, प्रा.ज्योतीरंजन राऊत, प्रा.अभिराम देशमुख, प्रा.समीर आसोले, पुजा स्वामी, निकीता महाजन विद्यार्थ्यांमध्ये धीरज जोशी, रुपाली अबोरे, स्नेहल मत्ते, पायल लांजे, आदीत्य हजारे, अदनान बेग, वैभव हाडे, सुरज मानकर, शुभम इंगोले, शुभम मुडे, अनिकेत गायकवाड, तृप्ती राठोड रक्तदान केले.

The Hitavada

NAGPUR ■ Monday ■ January 20 ■ 2020

# IPER, Borgaon (Meghe)

A BLOOD donation camp was organised by Institute of Pharmaceutical Education and Research (IPER), Sawangi (Meghe), in co-operation with Datta Meghe Institute of Medical Sciences, Sawangi (Meghe), Wardha, to celebrate birthday of Dr P G Yeole, the Vice-Chancellor, Dr Baba Saheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. Dr R O Ganjiwale, In-charge Principal, IPER, Wardha, Dr B S Sathe, Principal, Institute of Diploma in Pharmacy, Wardha, and Dr Kishor Hiwale, Pathologist, JNMC, Sawangi, were present on the occasion. Dr R O Ganjiwale delivered introductory remarks. He assured that blood of required blood group will be made available to the needy and poor patients. Total 54 students and 7 staff members participated in blood donation. Dr N A Karande, Co-ordinator of NSS, and Jyotiranjan Roul organised the camp.



Digntiaries and blood donors present in the camp.

लोकमत
सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२०



पारितोषीक प्राप्त विद्यार्थ्यांसह कुलगुरु शुक्ल, प्राचार्य गंजीवाले, नारायणे.

# रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय प्रथम

## प्रा.राम मेघे स्मृती वादविवाद स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

वर्धा : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती व औषधी निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. राम मेघे स्मृतीप्रित्यर्थ विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी (मेघे) येथील प्रतीक्षा थुटे व श्रुतिका ठाकूर या विद्यार्थ्यांनी सांघिक प्रथम क्रमांक पटकाविला.

'भारतीय राजकारणात विद्यार्थ्यांचा सहभाग सुशासनसाठी उपयुक्त ठरेल' हा वादविवाद स्पर्धेचा विषय होता. यामध्ये द्वितीय क्रमांक आयपर विद्यालयाच्या नंदीनी काळे व निखील हटवार यांनी पटकाविला. तर वैयक्तिक पारितोषीक प्रतीक्षा थुटे, नंदीनी काळे व अवनी तांबी यांना मिळाले. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी हिंदी हिंदी विद्यापीठाचे कुलगुरु रजनीशकुमार शुक्ल उपस्थित होते. परीक्षक म्हणून यशवंत महाविद्यालयातील प्रा. प्रमोद नारायणे व लोक महाविद्यालयातील प्रा. सुनील पाटणे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले व डॉ. भुषनकुमार साठे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. राम मेघे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्राचार्य डॉ. गंजीवाले यांनी स्व. मेघे यांच्या राजकीय व सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी रजनीशकुमार शुक्ल यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कुलगुरु शुक्ल यांनी भारतीय राजकारणात विद्यार्थ्यांचा सहभाग सुशासनासाठी योग्य राहील असे सांगितले. प्रा. नारायणे यांनी वादविवाद स्पर्धेच्या विषयावर मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेत विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ व वर्धा येथील २१ चमुनी सहभाग नोंदविला होता.

लोकमत
www.lokmat.com
नागपूर, गुरुवार,
दि. २७ फेब्रुवारी २०२०



# औषधी निर्माण शास्त्र शिक्षण संस्था

वर्धा : स्थानिक औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव(मेघे) येथे वार्षिक स्नेहसंमेनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे, डॉ. जयंत गंगाखेडकर, माजी विद्यार्थी डॉ. प्रेमचंद नखत, प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले, डॉ. भुषणकुमार साठे, डॉ. एल.जी. राठी उपस्थित होते. यावेळी डॉ. नखत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये श्रेया खालोकर, नक्षत्रा नागफासे, साक्षी झाडे, प्रतीक चर्जन, श्वेता गवळी, कोमल खराबे, श्रीकांत तापडीया या सर्वांचा सुवर्ण पदक व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन् डॉ. मनीषा पुराणिक यांनी केले तर आभार आदिती राठी हिने मानले.

लोकमत
शुक्रवार, दि.२८ फेब्रुवारी २०२०

## फार्मसी कॉलेज बोरगाव

वर्धा : औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे) वर्धा येथे राष्ट्र गीत व मराठी भाषा गौरव दिन आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर ओ गंजीवाले यांनी मराठी दिनानिमित्त मार्गदर्शन केले.

लोकमत
मंगळवार २१.१२.२०२०

# आयपरमध्ये ऑनलाईन चर्चासत्रात प्राध्यापकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** औषधी निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन महाविद्यालय बोरगाव (मेघे) येथे एआयसीटीई नवी दिल्ली व आयपर यांच्या संयुक्त विद्यमाने आउटकम बेस टिचिंग लर्नींग व ॲक्रीडिएशन या विषयावर प्रशिक्षण पार पडले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे होते. अखिल भारतीय तंत्र शिक्षण संस्था नवी दिल्लीचे संचालक डॉ.राजेंद्र काकडे, प्राचार्य डॉ.राजेंद्र गंजीवाले, प्रशिक्षण समन्वयक डॉ.मनीषा पुराणिक पस्थित होते. .प्रास्ताविक प्राचार्य डॉ.गंजीवाले यांनी केले. डॉ. काकडे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. संस्थाध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी प्रशिक्षणाच्या विषयावर मत व्यक्त केले. शिबिरात भारतातील फार्मसी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी भाग घेतला.

यात पंजाब, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र या राज्यातील प्राध्यापकांनी भाग घेतला. प्रशिक्षणाकरिता डॉ. महेश बुरांडे, पुणे, डॉ. व्ही. के. मौर्या, डॉ.साधना शाही, डॉ.विवेक नानोटी, डॉ. भूषण साठे, , डॉ.प्रशांत पुराणिक, डॉ.अनवर शेख, डॉ.एन.के.जैन, डॉ.संजय जाचक ; डॉ.रघु रामाराव, , डॉ.बी.एन.सिन्हा, राजी, डॉ. समीत भटाचार्य, यांनी मार्गदर्शन केले. संचालन डॉ. मनीषा पुराणिक यांनी केले. आयोजनासाठी प्रा. सुनील देवानी, प्रा. देशमुख, प्रा.ज्योतीरंजन प्रा. साधना गौतम, डॉ. ललित राठी, डॉ. दिलेश सिंघवी व डॉ. भूषण गंधारे, प्रा. मिलिंद भोयर यांनी सहकार्य केले. या चर्चासत्रात विविध विषयांवर मंथन करण्यात आले.